लोकमत

# ग्रामस्वच्छता अभियानात ढोरखेडा ग्रामपंचायत अव्वल

**मालेगाव :** मालेगाव तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत असलेल्या ढोरखेडा ग्रामपंचायतला दुसऱ्यांदा संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाअंतर्गत सन २०२३-२०२४ चा जिल्हास्तरीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेचा प्रथम पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्काराने जिल्ह्यात ढोरखेडा गावाने मानाचा एक तुरा आणखी रोवला गेला आहे.

शासनाच्यावतीने ग्रामस्तरावर विविध योजना राबवल्या जातात. गाव स्वच्छ व सुंदर राहण्यासाठी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानअंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा घेऊन त्यात तालुका जिल्हा व विभागस्तरावर पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारासाठी तालुका व जिल्हास्तरातून जिल्हास्तरीय समितीतर्फे जिल्ह्यांतील ग्रामपंचायत तपासल्या जातात व त्यानुसार पुरस्कार जाहीर होत असतो.

यावर्षी जिल्हास्तरीय समितीतर्फे जिल्ह्यातील एकूण ९ ग्रामपंचायतींची तपासणी करण्यात आली होती. या तपासणीत संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानअंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा सन २०२३-२०२४ च्या जिल्हास्तरातील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार हा मालेगाव तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत असणाऱ्या ग्रामपंचायतला दुसऱ्यांदा मिळाला आहे. तर द्वितीय पुरस्कार कारंजा तालुक्यातील मावळ ग्रामपंचायतला तर तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मंगरूळपीर तालुक्यातील कोलारा ग्रामपंचायतला जाहीर झाला आहे. या पुरस्कारामुळे गावात याहीपेक्षा अधिक उपक्रम राबवून पुन्हा हा पुरस्कार कसा मिळवता येईल याचा प्रयत्न केला जाईल असे सरपंच सुनीता भवन मिटकरी यांनी सांगितले. तर हा पुरस्कार मिळवण्यासाठी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायतचे सचिव मोहन वानखेडे यांनी परिश्रम घेतले.

Hello Washim
Page No. 1 Feb 22, 2024
Powered by: erelego.com